महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, सर्व्हे नं.१५६०/१
आडगांव शिवार,आडगांव नाशिक–४२२००३
Website-sscboardnashik.com

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Serve No.1560/1
Adgaon Shivar, Adgaon, Nashik-422003.
Email-nsksec@rediffmail.com

अत्यंत महत्वाचे / परीक्षा प्राधान्य

क्रमांक/नाविमं/उ.मा अ–३/माध्य. ब–३/3868
नाशिक – ४२२००३.
दिनांक – ०५/ ०२ /२०२४

प्रति,

केंद्रसंचालक,
इ.१० वी व इ.१२ वी
जिल्हे– (नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार)

विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी–मार्च २०२४ शिक्षासूची वाचनाबाबत...

संदर्भ :–१) राज्यमंडळाचे क्र.रा.मं./परीक्षा–८/१३० दिनांक ११/०१/२०२४ रोजीचे पत्र......

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) परीक्षांचे आयोजन फेब्रुवारी–मार्च २०२४ मध्ये करण्यात आलेले आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे आणि परीक्षेशी संबंधित घटकांच्या वैचारीक मनोवृत्तीमुळे परीक्षेत विविध मार्गांनी निष्पन्न होणाऱ्या गैरप्रकारांना मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो. त्यादृष्टीने मंडळ स्तरावर विविध उपाययोजना आणि उपक्रम राबविले जातात. याच धर्तीवर विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरवापर करू नये, यासाठी *गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यास मंडळाच्या शिक्षासूचीनुसार होणारी कार्यवाही अवगत करणे आवश्यक असल्याने आपण आपल्या परीक्षा केंद्रास जोडलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना या पत्रासोबत जोडलेल्या सदरच्या सूचनांबाबतची कार्यवाही करणेसाठी आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.*

यासाठी विद्यार्थ्यांसाठी असणारी शिक्षासूची तसेच उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील मागील बाजूच्या पृ.क्र.२ वर असणाऱ्या सूचना यांचे सामूहिक वाचन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसमोर परीक्षेपूर्वी/प्रात्यक्षिक परीक्षा कालावधीत करणे आवश्यक आहे, शक्य असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास सूचनांची एक प्रत देण्यात यावी. सदर कार्यवाही केल्याबाबत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेवून सदरचे दस्ताऐवज शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या दप्तरी जतन करून ठेवण्यात यावे. तसेच याबाबतचे प्रमाणपत्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या **nsksec@rediffmail.com** ई–मेलवर पाठवावे.

विद्यार्थ्यांसाठी शिक्षासूची, उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठाच्या मागील बाजूच्या सूचना व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर करावयाचे प्रमाणपत्राचा नमुना इ. राज्यमंडळाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्द करण्यात येईल तेव्हा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपला लॉगीन आयडी वापरून डाउनलोड करून घ्यावा. तसेच सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळास तात्काळ सादर करावा.

(एम.एस.देसले)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, आडगांव शिवार
नाशिक–४२२ ००३

- प्रत माहितीस्तव:–

मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे–०४

- प्रत माहितीस्तव तथा पुढिल कार्यवाहीस्तव:–

शिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परीषद (नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळामार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी व परीक्षार्थी इत्यादींच्या संदर्भातील प्रस्तावित शिक्षासूची -

परिशिष्ट भाग-२ (ब-१)

परीक्षार्थी

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | कोणत्याही परीक्षार्थ्याने मंडळाच्या कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेल्या ऑनलाईन/ ऑफलाईन अर्जामध्ये खोटी माहिती सादर करणे. | ------------ | ------------ | १) डिबार परीक्षार्थ्यांचे बाबतीत त्याच्या प्रतिबंधित कालावधीपर्यंत प्रतिबंध करणे. २) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास त्या परीक्षेची संपादणूक रद्द करणे. |
| २ | परीक्षार्थ्याने खोटी प्रमाणपत्रे/ गुणपत्रिका/कागदपत्रे देऊन इ.९ वी/इ. १० वी अगर इ. ११ वी/ इ. १२ वी मध्ये प्रवेश घेऊन त्या आधारे इ. १० वी/इ. १२ वी परीक्षेस आवेदनपत्र सादर करणे. | ------------ | ------------ | १) परीक्षेपूर्वी निदर्शनास आल्यास परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. २) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे |
| ३ | परीक्षार्थ्याने परीक्षेपूर्वी अगर ऐन वेळी खोटे/प्रतिज्ञापत्र/हमीपत्र/ अपघाताचा/ अपंगत्वाचा वैद्यकीय दाखला केंद्रसंचालकाकडे सादर करून सवलत घेणे व विषय/केंद्र बदलून परीक्षेस प्रविष्ट होणे. | ------------ | ------------ | १) परीक्षेपूर्वी निदर्शनास आल्यास परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे. २) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. ३) संबंधित परीक्षार्थ्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करणे. |

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| ४. | मंडळाकडून परीक्षेला प्रविष्ट होण्यासाठी देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर/द्वितीय प्रतीवर अनधिकृतपणे बदल करणे/बनावट प्रवेशपत्र तयार करणे व त्याआधारे परीक्षेस प्रविष्ट होणे. | ------------ | ------------ | १)परीक्षेपूर्वी निदर्शनास आल्यास परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करणे.<br>२) परीक्षेनंतर निदर्शनास आल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे.<br>३) संबंधित परीक्षार्थ्याविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करणे. |
| ५ | मंडळाकडून परीक्षेला प्रविष्ट होण्यासाठी देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावर/द्वितीय प्रतीवर अनधिकृतपणे बदल करणे व त्या आधारे स्वतःऐवजी अन्य व्यक्तीने (तोतया) परीक्षेस प्रविष्ट होणे, निकाल जाहीर झाल्यानंतर तोतयेगिरी अगर गैरमार्ग प्रकरणे उघडकीस येणे. | ------------ | ------------ | १) संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे व पुढील पाच परीक्षांना प्रतिबंध करणे.<br>२) मूळ परीक्षार्थी व तोतया विद्यार्थ्याविरुद्ध केंद्रसंचालकाने / विभागीय मंडळाने प्रकरणपरत्वे फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| ६ | मंडळाच्या अधिकृत उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे, लॉग टेबल, अनधिकृतपणे मिळवणे/आणि वापर करणे. | मंडळाच्या अधिकृत उत्तरपत्रिका, पुरवण्या, आलेख, नकाशे, लॉग टेबल, अनधिकृतपणे मिळवणे/आणि वापर करणे. | ------------ | परीक्षार्थ्याची संबंधित विषयांची संपादणूक रद्द करणे व पुढील एका परीक्षेस प्रतिबंध करणे. |
| ७ | मंडळ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची चोरी करणे, मिळविणे, विकणे व विकत घेणे तसेच भ्रमणध्वनी व अन्य इलेक्ट्रॉनिक्स माध्यमावर प्रसारित करणे व मिळविणे. | मंडळ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची चोरी करणे, मिळविणे, विकणे व विकत घेणे तसेच भ्रमणध्वनी व अन्य इलेक्ट्रॉनिक्स माध्यमावर प्रसारित करणे व मिळविणे. | ------------ | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे.<br>२) पुढील पाच परीक्षांना प्रतिबंध करणे<br>३) परीक्षार्थ्याविरुद्ध प्रकरणपरत्वे फौजदारी/सायबर लॉ ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करणे. |
| ८ | ------------ | मंडळाने मान्यता न दिलेली अथवा प्रतिबंध केलेली साधने/साहित्य परीक्षा दालनात स्वतःजवळ बाळगणे/वापरणे. | ------------ | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| ९ | ------------ | परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू असताना विषयाशी संबंधित अथवा अन्य कोणतेही हस्तलिखित, कागद, वह्या, टिपण्या, मार्गदर्शिका, पुस्तकातील पाने, पुस्तक, नकाशे, इ. जवळ बाळगणे/ कपड्यावर/रायटींग पॅडवर/हातावर किंवा शरीराच्या भागावर लिहून ठेवणे.<br>परीक्षार्थ्यांच्या टेबल, खुर्ची, ड्युएल डेस्कमध्ये विषयाशी संबंधित असलेले कॉपी साहित्य आढळणे. | ------------ | १) परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द<br>२) जवळ बाळगलेल्या कॉपी साहित्याचा काही भाग/संपूर्ण भाग उत्तरपत्रिकेत लिहील्याचे सिध्द झाल्यास संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. |
| १० | ------------ | परीक्षा केंद्रात/परीक्षादालनात कोणत्याही प्रकारचे हत्यार/शस्त्र घेऊन येणे किंवा स्वतःजवळ बाळगणे, धमकावणे व दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणे. | ------------ | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द व त्याच्याविरुध्द पोलीसात फौजदारी गुन्हा दाखल करणे.<br>२) पुढील पाच वर्ष परीक्षेस प्रतिबंध करणे. |
| ११ | ------------ | उत्तरपत्रिका, पुरवणी/नकाशा व आलेखासोबतच्या पुरवणीचा काही भाग निळ्या किंवा काळ्या शाईव्यतिरिक्त अन्य शाईत (उदा. लाल,हिरवी, इ.) लिहिणे, काळा/निळा बोरू पेन तथा शीर्षकासाठी रंगीत शाई/स्केच पेन व आकृत्यांसाठी हिरवी/लाल शाई किंवा रंगीत पेन्सिलचा वापर करणे / व्हायटनरचा वापर करणे.<br>मजकूर पेन्सिलने लिहीणे. | ------------ | संदर्भीत भागास गुणदान न करणे. |
| १२ | ------------ | उत्तरपत्रिकेत/पुरवणीत प्रक्षोभक/अर्वाच्य भाषेचा वापर, शिवीगाळ लिहिणे किंवा धमक्या देणे, बैठक क्रमांक/फोन नंबर/भ्रमणध्वनी क्रमांक देऊन संपर्क साधण्यास सुचविणे/विनंती करणे. विषयाशी संबधित नसलेला अन्य मजकूर लिहिणे (चुकीची उत्तरे वगळून). | ------------ | चौकशी करुन परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रदद करणे. |
| १३ | ------------ | लेखी विनंती, उत्तरपत्रिकेला चलनी नोटा जोडणे/आर्थिक आमिष दाखवणे. | ------------ | १) उत्तरपत्रिकेस जोडलेली संपूर्ण चलनी रक्कम विभागीय मंडळाने जप्त करणे.<br>२) परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे . |
| १४ | ------------ | परीक्षादालनात अन्य परीक्षार्थ्याची उत्तरपत्रिका/पुरवणी/बारकोड जबरदस्तीने/बळजबरीने/संगनमताने ताब्यात घेणे, खराब करणे, फाडणे, लिहीणे, खोडणे, इ. | ------------ | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द.<br>२) केंद्रसंचालकांनी पोलीसात गुन्हा दाखल करणे. |

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्तीचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १५ | ------------ | परीक्षादालनात कॉपी करण्यास मदत करण्यासाठी अन्य परीक्षार्थ्यांना धमकावणे किंवा बळजबरी करणे. | ------------ | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. २) केंद्रसंचालकांनी पोलीसात गुन्हा दाखल करणे. |
| १६ | ------------ | पर्यवेक्षक, केंद्रसंचालक, परिरक्षक, परीक्षेशी संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच परीक्षक, नियामक, मुख्य नियामक यांना स्वत: किंवा अन्य व्यक्तीद्वारे धमकी देणे किंवा दबाव आणणे किंवा मारहाण करणे. परीक्षा यंत्रणेतील घटकांना लाच देण्याचा प्रयत्न करणे. | पर्यवेक्षक, केंद्रसंचालक, परिरक्षक, परीक्षेशी संबंधित अधिकारी/कर्मचारी तसेच परीक्षक, नियामक, मुख्य नियामक यांना स्वत: किंवा अन्य व्यक्तीद्वारे धमकी देणे किंवा दबाव आणणे किंवा मारहाण करणे. परीक्षा यंत्रणेतील घटकांना लाच देण्याचा प्रयत्न करणे.. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. २) संबंधित बाधित व्यक्तीने/केंद्रसंचालक यांनी परीक्षार्थ्याविरुद्ध पोलीसांत फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| १७ | ------------ | परीक्षादालनात पकडण्यात आलेले गैरमार्गाचे प्रकरण मंडळाकडे न पाठविण्यासाठी स्वत: अगर इतर व्यक्तीमार्फत केंद्रसंचालक/ उपकेंद्रसंचालक/पर्यवेक्षक यांच्यावर दबाव आणणे. | ------------ | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. २) केंद्रसंचालक यांनी परीक्षार्थ्याविरुद्ध पोलीसात फौजदारी गुन्हा दाखल करणे. |
| १८ | ------------ | परीक्षा सुरू असताना इतर परीक्षार्थ्यांबरोबर उत्तराच्या संदर्भात गैरहेतूने संपर्क साधणे/एकमेकांचे पाहून लिहिणे, अन्य परीक्षार्थ्यास तोंडी उत्तरे सांगणे. | ------------ | परीक्षार्थ्याची/परीक्षार्थ्यांची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |
| १९ | ------------ | परीक्षादालनात जाणूनबुजून दोन किंवा दोनपेक्षा अधिक परीक्षार्थ्यांनी एकत्रितरीत्या नक्कल करणे किंवा गैरमार्गाचा अवलंब करणे/सामुदायिक कॉपी करणे. | ------------ | परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. व पुढील एक परीक्षा प्रतिबंध. |
| २० | ------------ | परीक्षादालनात परीक्षा सुरू असताना प्रश्नपत्रिकेवर उत्तरे लिहिणे/लिहून दुसऱ्या परीक्षार्थ्याकडे देणे/प्रश्नपत्रिकेवर उत्तरासाठी खुणा करणे. | ------------ | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे. |
| २१ | ------------ | स्वत:ची/दुसऱ्या परीक्षार्थ्याची उत्तरपत्रिका किंवा पुरवणी उत्तरपत्रिकेची पृष्ठे, पुरवणी उत्तरपत्रिका, बारकोड, हॉलोक्राफ्ट, नकाशा, आलेख पुरवणी नष्ट करणे/नष्ट करण्याचा प्रयत्न करणे, स्वत:बरोबर दालनाबाहेर घेऊन जाणे | ------------ | १) प्रकरणपरत्वे परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची / संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द करणे. २) केंद्रसंचालकांनी पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |
| २२ | ------------ | परीक्षार्थ्याकडे आढळून आलेले कॉपी साहित्य परीक्षार्थ्याने नष्ट करण्याचा प्रयत्न करणे. (उदा.- खिडकीतून बाहेर फेकणे/फाडून टाकणे/खाणे इ.) | ------------ | परीक्षार्थ्याची संबंधित विषयाची संपादणूक रद्द करणे . |

| अ.क्र. | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (A) परीक्षापूर्व | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (B) परीक्षाकाळात | त्रुटी/चुका/गैरप्रकार/गुन्हा यांचा तपशील (C) परीक्षोत्तर | शास्ताचा तपशील |
|---|---|---|---|---|
| २३ | ------------ | परीक्षार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरपत्रिका परिरक्षक कार्यालयात जमा झाल्यानंतर परीक्षार्थ्याने स्वतः किंवा अन्य व्यक्तीमार्फत बाहेर नेणे व पुनःश्च परिरक्षक कार्यालयात जमा करणे. | परीक्षार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तरपत्रिका परिरक्षक कार्यालयात जमा झाल्यानंतर परीक्षार्थ्याने स्वतः किंवा अन्य व्यक्तीमार्फत बाहेर नेणे व पुनःश्च परिरक्षक कार्यालयात जमा करणे. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द २) पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |
| २४ | ------------ | स्वतःची किंव इतर परीक्षार्थ्यांची लिहिलेली उत्तरपत्रिका आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अनधिकृतपणे घेऊन येणे/जाणे तसेच परीक्षा केंद्रात अन्य ठिकाणी/परीक्षा केंद्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी लिहून आणलेली आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अवैधमार्गाने घेऊन जाणे/येगे. | स्वतःची किंवा इतर परीक्षार्थ्यांची लिहिलेली उत्तरपत्रिका आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अनधिकृतपणे घेऊन येणे/जाणे तसेच परीक्षा केंद्रात अन्य ठिकाणी/ परीक्षा केंद्राव्यतिरिक्त अन्य ठिकाणी लिहून आणलेली आणि/किंवा पुरवणी उत्तरपत्रिका अवैध मार्गाने घेऊन जाणे/येणे. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द . व पुढील एक परीक्षा प्रतिबंध. २) पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |
| २५ | ------------ | उत्तरपत्रिका/पुरवणी उत्तरपत्रिका किंवा त्याचा काही भाग (पूर्णतः किंवा अंशतः) परीक्षार्थ्याच्या स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेला नसणे. | ------------ | परीक्षार्थ्याची त्या विषयाची संपादणूक रद्द. व पुढील दोन परीक्षा प्रतिबंध. |
| २६ | ------------ | ------------ | परीक्षक, नियामक, मुख्य नियामक यांच्याकडे जाऊन अगर अन्यत्र संपर्क साधून उत्तरपत्रिकेत/ पुरवणी उत्तरपत्रिकेत बदल करणे/ उत्तरपत्रिकेत/ पुरवणी उत्तरपत्रिकेत स्वतः अगर अन्य व्यक्तीकडून जादा मजकूर लिहिणे/लिहून घेणे/पाने समाविष्ट करणे. | १) परीक्षार्थ्याची संपूर्ण परीक्षेची संपादणूक रद्द. व पुढील दोन परीक्षा प्रतिबंध. २) संबंधित दोषी विरुध्द पोलीसांत गुन्हा दाखल करणे. |

प्रकरणिका क्र. [ ] टिप्पणी पृष्ठ क्र. [ ]

(24)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४

कार्यालयीन टिप्पणी

## उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांकरिता सूचना

१. परीक्षार्थ्यांनी प्रवेशपत्र आणि ओळखपत्र दररोज बरोबर आणावे. पर्यवेक्षक, केंद्रसंचालक व केंद्राला भेट देणारे अधिकारी ज्या ज्या वेळी प्रवेशाची व ओळखपत्राची मागणी करतील त्या प्रत्येक वेळी त्यांना ते दाखविता आले पाहिजे.

२. परीक्षेच्या प्रत्येक पेपरच्या वेळी परीक्षा दालनात परीक्षार्थ्यास पर्यवेक्षकाकडून बारकोड स्टिकर मिळाल्यानंतर विषय,बैठक क्रमांक याची खात्री करून उपस्थिती पत्रकावर ( Form -1 )बैठक क्रमांक बारकोड स्टिकर क्रमांक लिहून स्वाक्षरी करावी आणि त्यानंतर बारकोड स्टिकर उत्तरपत्रिकेवर दिलेल्या जागेवरच काळजीपूर्वक चिकटवावा.

३. उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर तसेच पुरवणी उत्तरपत्रिकेवर ठराविक रकान्यात बैठक क्रमांक अंकात व अक्षरात बिनचूक लिहून स्वाक्षरी करावी.

४. परीक्षार्थ्यांनी उत्तरपत्रिका मिळाल्यानंतर व पर्यवेक्षकाकडे जमा करताना ती सुस्थितीत असल्याची व त्यात सर्व पृष्ठे असल्याची खात्री करून घ्यावी.

५. उत्तरपत्रिकेच्या पृष्ठ क्र. ३ पासून लिहीण्यास प्रारंभ करावा.

६. उत्तरपत्रिकेच्या पानाच्या दोन्ही बाजूस समान समास सोडू नये.केवळ डाव्या बाजूसच समास सोडावा.

७. प्रत्येक पानाच्या दोन्ही बाजूस लिहावे. उत्तरपत्रिका किंवा पुरवणी उत्तरपत्रिकेचे कोणतेही पान फाडू नये.फाडल्यास परीक्षार्थी शिक्षेस पात्र राहील.

८. पर्यवेक्षकाकडून घेतलेल्या उत्तरपत्रिकेवर व पुरवण्यांवर पर्यवेक्षकाची स्वाक्षरी असल्याची खात्री करून घ्यावी तसेच उत्तरपत्रिकेसोबत जोडलेल्या पुरवण्यांची संख्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावर बिनचूक नोंदवावी.

९. प्रश्नपत्रिका मिळताच प्रश्नपत्रिकेच्या वरील भागावर,प्रत्येक पृष्ठावर उजव्या बाजूस स्वत:चा बैठक क्रमांक नोंदवावा.

**फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून विद्यार्थ्यांना नियोजीत वेळेच्या १० मिनीटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरित करण्याची पध्दत बंद करण्यात आली आहे.परंतु विद्यार्थी हित लक्षात घेता सदरची १० मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर वाढवून देण्यात येत आहेत.**

**फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून सकाळ सत्रात सकाळी ११=०० वाजता तसेच दुपार सत्रात दु. ३=०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल. सकाळी ११=०० पूर्वी व दुपारी ०३ पूर्वी कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिकांचे वितरण होणार नाही. याची दक्षता घेतली जाईल.**

१०. कच्चे लिखाण करावयाचे झाल्यास ते पेन्सिलनेच आणि उत्तरपत्रिकेच्या डाव्या हाताच्या पृष्ठभागावरच करावे. त्या पृष्ठावर कच्चे लिखाण असा स्पष्ट उल्लेख असावा. सुटया कागदावर अथवा प्रश्नपत्रिकेवर कच्चे लिखाण करण्यात येऊ नये.

११. संबंधित सेक्शन/प्रश्न/उपप्रश्नांचे उत्तर जेथून सुरू होते तेथेच समासात सेक्शन/प्रश्न/उपप्रश्न क्रमांक अचूक व स्पष्ट लिहावा.यासाठी वेगवेगळया शाईचा वापर करू नये.

१२. एकाच सेक्शनच्या /प्रश्नाच्या वेगवेगळया प्रश्न /उपप्रश्नाकरीता वेगवेगळी पृष्ठे उपयोगात आणू नयेत.

१३. परीक्षार्थ्याने उत्तराचा काही भाग खोडला असेल अथवा त्याला शाईत बदल करावा लागला असेल अथवा कोरा भाग सोडल्यामुळे त्याठिकाणी निळया /काळया शाईने रेघ मारली असेल अशा ठिकाणी पर्यवेक्षकाची स्वाक्षरी घेऊ नये.

१४. परिक्षार्थ्यांनी उत्तरपत्रिकेवर निळया अथवा काळया शाईचाच वापर करावा अन्यथा मजकुरास गुणदान केले जाणार नाही.

१५. परिक्षार्थ्यांविरूध्द खालीलपैकी कोणत्याही कारणास्तव नियमानुसार शिक्षेची कारवाई होऊ शकेल.

अ) पुस्तक,नोट्स,मजकूर असलेला कागद परीक्षा दालनात आणणे,शरीरावर ,कपडयांवर मजकूर लिहिलेला असणे.

ब) कोणत्याही परीक्षार्थ्यांशी बोलणे/संपर्क साधणे /एकटयाने अथवा सामुदायिक कॉपिंग करणे.

क) प्रश्नपत्रिका ,उत्तरपत्रिका अथवा उत्तरपत्रिकेतील पाने किंवा पुरवणी परीक्षा कक्षातून बाहेर नेणे.

ड) उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका ,प्रश्नपत्रिका आदींची अदलाबदल करणे,इतरांना देणे घेणे.

इ) केंद्रसंचालक अथवा पर्यवेक्षकाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन न करणे अथवा गैरप्रकार करणे.

१६. उत्तरपत्रिकेत/पुरवणीत प्रक्षोभक/असांविधानिक भाषेचा वापर, शिवीगाळ लिहिणे किंवा धमक्या देणे,बैठक क्रमांक/फोन नंबर /भ्रमणध्वणी क्रमांक देऊन संपर्क साधण्यास सुचविणे /विनंती करणे याद्वारे स्वत:ची ओळख देणे (उदा.विशिष्ठ खुण करणे,चिन्ह काढणे नांव,पत्ता लिहिणे,शाळेचे केंद्राचे,गावाचे नांव अथवा अन्य कोणत्याही प्रकारे ओळख पटविणारी बाब) इत्यादी कृती केल्यास अशा परीक्षार्थ्यांची चौकशी करून संबंधित विषयाची संपादणूक रद्द करण्यात येईल.

१७. परीक्षा सुरू झाल्यानंतर कोणत्याही परीक्षार्थ्यास परीक्षा संपेपर्यंत परीक्षागृहाबाहेर जाता येणार नाही,मात्र अपवादात्मक परिस्थितीत परीक्षागृहाबाहेर जावयाचे असल्यास परीक्षार्थ्याने प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे जमा करणे आवश्यक आहे.

१८. प्रत्येक पेपर संपण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर इशारा घंटा होईल,त्यांनतर विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिका व पुरवण्यावर काळया रंगाचा होलोक्राफ्ट स्टिकर सेक्शन प्रत्येकी एक याप्रमाणे दिलेल्या जागेवरच बरोबर चिकटवावा.प्रत्येक पेपरच्या शेवटी अंतिम घंटा होईल. अंतिम घंटा होताच उत्तरे लिहीणे थांबवावे आणि मूळ उत्तरपत्रिका व पुरवण्या बरोबर बांधल्याची खात्री करावी. त्याचप्रमाणे मुखपृष्ठावर एकूण पुरवण्याची नोंद करण्यात यावी.आणि पर्यवेक्षकाने सर्व उत्तरपत्रिका गोळा करेपर्यंत परीक्षार्थ्यांनी आपले आसन सोडू नये.

१९. परीक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्राचा/ओळखपत्राचा दुरूपयोग जो कोणी परीक्षा काळात करील त्याचे व संबंधित विद्यार्थ्याचे वर्तन अजामीनपात्र व दखलपात्र गुन्हा आहे. दोन्ही संबंधिताविरुध्द नियमानुसार कारवाई केली जाईल.

२०. उत्तरपत्रिकेत स्केच पेनचा वापर करता येणार नाही. आकृत्यांसाठी साध्या पेन्सिलचा वापर करावा. भाषा विषय कृतिपत्रिकामध्ये आकृत्यांसाठी पेनचा वापर करावा.

२१. परीक्षार्थ्यांना परीक्षागृहात मोबाईल,इलेक्ट्रॉनिक घडयाळ, Pocket Calculator वा तत्सम इलेक्ट्रॉनिक्स् उपकरणांचा वापर करता येणार नाही.

२२. मंडळाने दिलेली अधिकृत लॉग टेबल वापरावे व पेपर संपल्यानंतर परत करावे.

२३. परीक्षार्थ्यांनी परीक्षेसाठी सकाळ सत्रात सकाळी १०.३० वाजता व दुपार सत्रात दुपारी २.३० वाजता उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सकाळ सत्रात १०.३० नंतर व दुपार सत्रात २.३० नंतर परीक्षा दालनात प्रवेश दिला जाणार नाही. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

# * प्रमाणपत्र *

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा जुलै–ऑगस्ट २०२३

,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,

आमच्या शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील जुलै–ऑगस्ट २०२३ परीक्षेसाठी प्रविष्ठ होण–या विद्यार्थ्यांच्या समोर गैरप्रकारासंबधी असलेल्या मंडळ शिक्षासूची व उत्तरपत्रिकेवरील विद्यार्थ्यासाठीच्या सूचना यांचे सामूहिक वाचन /प्रत्येक विद्यार्थ्यास एक प्रत देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव–

शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक कमांक –

मुख्याध्यापक /प्राचार्य यांची स्वाक्षरी–

शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का –